## महाराष्ट्र कृषि सेवा परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील :-**

**१.१** राज्य शासनाच्या कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र कृषि सेवेतील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात:-

**१.२ पदांचा तपशील :-**

**१.२.१** संवर्ग - अराजपत्रित, गट-अ आणि गट- ब

**१.२.२** नियुक्तीचे ठिकाण - महाराष्ट्रात कोठेही

**१.२.३** वेतनबँड व ग्रेड वेतन :-

**(१) कृषि अधिकारी,गट अ :-** रुपये १५,६००-३९,१००, ५,४०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते.

**(२) कृषि अधिकारी,गट ब :-** रुपये ९,३००-३४,८००, ४,६०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते.

**(३) कृषि अधिकारी,गट ब कनिष्ठ :-**रुपये ९,३००-३४,८००, ४,४०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते.

**१.२.४** उच्च पदावर बढतीची संधी - ज्येष्ठता व पात्रतेनुसार महाराष्ट्र कृषि सेवेतील वरिष्ठ पदावर.

**१.३** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात / अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येईल.

**२. परीक्षेचे टप्पे :-**

**२.१** प्रस्तुत परीक्षा एकूण तीन टप्प्यात घेण्यात येते :-

**(एक)** पूर्व परीक्षा - २०० गुण. **(दोन)** मुख्य परीक्षा - ६०० गुण. **(तीन)** मुलाखत - ७५ गुण

**२.२** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते.

**२.३** पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणारी नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जात नाहीत.

**२.४** मुख्य परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतात.

**२.५** जाहिरातीतील तरतुदीनुसार विहित अटींची पूर्तता करणा-या व मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ कागदपत्रे सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते.

**३. अर्हता :-**

**३.१** मान्यताप्राप्त संस्थेकडून कृषि किंवा कृषि अभियांत्रिकी अथवा उद्यानविदया या विषयातील पदवी किंवा त्याच विदयाशाखेतील अन्य कोणतीही समतुल्य अर्हता.

**३.२** प्रस्तुत भरतीकरीता खालील शैक्षणिक अर्हता शासनाने बी.एसस्सी (कृषि)/बी.टेक (कृषि अभियांत्रिकी) व तत्सम पदव्यांशी समतुल्य म्हणून मान्य केल्या आहेत:-

| अ.क्र. | संदर्भ | अर्हता |
|---|---|---|
| १. | शासन निर्णय, कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक : आकृवि-१२११/प्र.क्र.२०८/ १५ ए , दिनांक ७ सप्टेंबर, २०११. | (१) बी.एसस्सी (कृषि जैव तंत्रज्ञान)<br>(२) बी.एसस्सी (कृषि व्यवसाय व्यवस्थापन)<br>(३) बी.एसस्सी (गृह विज्ञान)<br>(४) बी.टेक (अन्नतंत्र)<br>(५) बी.एफ.एसस्सी.<br>(६) बी.एसस्सी (उद्यानविदया) |

**३.३** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**३.४** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**३.५** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने ही अट मुख्य परीक्षेची माहिती स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यत पूर्ण केली असली पाहिजे.

४. **शुल्क (फी) :-**

**४.१** प्रस्तुत परीक्षेकारीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | ` | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्ग |
| (१) | पूर्व परीक्षा | ३७३ | २७३ |
| (२) | मुख्य परीक्षा | ५२३ | ३२३ |

**४.२** वि.जा.(अ),भ.ज.(ब),वि.मा.प्र.,भ.ज.(क),भ.ज.(ड) व इ.मा.व. प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रीमी लेअर) मोडणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**४.३** उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रीमी लेअर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**४.४** दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च,१९७१ या कालावधीत पूर्व पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतामध्ये आलेल्या आणि दिनांक १ जून,१९६३ नंतर स्थलांतर करून भारतात आलेल्या मूळचे भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेश प्रतावर्ती उमेदवारांनी कोणतेही परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

५. **पूर्व परीक्षा :-**

**५.१ परीक्षा योजना :-**

**५.२ प्रश्नपत्रिका : एक.** प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| विषय (संकेतांक ०३९) | दर्जा | माध्यम | गुण | प्रश्नसंख्या | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| मराठी | शालांत | मराठी | १५ | ३० | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| इंग्रजी | पदवी | इंग्रजी | १५ | ३० | | |
| सामान्य अध्ययन व | पदवी | मराठी व इंग्रजी | ४५ | ९० | | |
| कृषि विषयक घटक | | | २५ | ५० | | |

**५.३ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर आहे.

**५.४. परीक्षा केंद्र :-**

**५.४.१** खालील ठिकाणी सदर परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |

| केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|
| नागपूर | **३२** |
| पुणे | **३८** |

**५.४.२** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**५.४.३** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**५.४.४** विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**५.४.५** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**५.४.६** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**५.५. पूर्व परीक्षेचा निकाल :-**

**५.५.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**५.५.२** भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे ८ पट उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुस-या टप्प्यात प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी १० पट उमेदवार उपलब्ध होतील, अशा रीतीने सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या

प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या राखीव प्रवर्गासाठीच्या पदावरच निवडीसाठी पात्र असतील.

**५.५.३** केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

**५.५.४** आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे ते विहित अटींची पूर्तता करतात, असे गृहित धरुन निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी  पात्र समजण्यात येईल.

**५.५.५** अशा रितीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर तसेच आयोगाच्या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.५.६** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तसेच मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.५.७** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

## ६. मुख्य परीक्षा :-

**६.१ परीक्षेचे टप्पे :-** दोन. लेखी परीक्षा व मुलाखत

### ६.२ परीक्षेस प्रवेश :-

**६.२.१** पूर्व परीक्षेकरिता विहित केलेल्या मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.२.२** मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**६.२.३** पूर्व परीक्षेसाठी अर्ज करताना आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व शैक्षणिक अर्हता मुख्य परीक्षेकरिता आवश्यक माहिती सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त केल्यास, अशा उमेदवारांला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल, इतर कोणत्याही दाव्यात बदल करता येणार नाही.

### ६.३ परीक्षा योजना :-

**६.३.१ एकूण गुण :** ६७५. (१) लेखी परीक्षा- ६०० गुण (२) मुलाखत- ७५ गुण

**६.३.२ प्रश्नपत्रिका —** दोन. एक अनिवार्य व एक वैकल्पिक. प्रत्येक प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| पेपर क्रमांक | विषय | माध्यम | दर्जा | प्रश्नांची संख्या | गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. (अनिवार्य) | कृषि- विज्ञान (संकेतांक ०१५) | इंग्रजी | कृषि पदवी | १०० | २०० | १ तास | वस्तुनिष्ठ |
| २. (वैकल्पिक) | कृषि (संकेतांक १०१) **किंवा** कृषि अभियांत्रिकी (संकेतांक १०२) | इंग्रजी | संबंधित विषयातील पदवी | २०० | ४०० | २ तास | वस्तुनिष्ठ |

**६.३.३ वैकल्पिक विषय :-**

(१) प्रस्तुत परीक्षेकरिता कृषि (संकेतांक १०१ ) किंवा कृषि अभियांत्रिकी (संकेतांक १०२) या दोन विषयांमधून कोणताही एक विषय मुख्य परीक्षेची माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

(२) आयोगाकडे माहिती सादर केल्यानंतर वैकल्पिक विषयात कोणताही बदल करण्यास कोणत्याही परिस्थितीत परवानगी दिली जाणार नाही.

**६.३.४ अभ्यासक्रम :-** सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**६.४ परीक्षा केंद्र :-**

**६.४.१** खालील चार ठिकाणी सदर मुख्य परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |

| केंद्र | केंद्राचा संकेतांक |
|---|---|
| नागपूर | **३२** |
| पुणे | **३८** |

**६.४.२** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमधून कोणतेही एक केंद्र मुख्य परीक्षेकरिता माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**६.४.३** उपरोक्त परीक्षाकेंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**६.४.४** विहित पद्धतीने माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले परीक्षा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**६.४.५** एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुसऱ्या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास त्याबाबतची सूचना संबंधितांना दिली जाईल.

**६.४.६** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**६.५ लेखी परीक्षेचा निकाल :-**

**६.५.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.५.२** भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी सुमारे ३ पट उमेदवार मुलाखतीसाठी उपलब्ध होतील अशा रितीने गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल.

**६.५.३** गुणांची सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, खेळाडू इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

**६.५.४** प्रत्येक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुलाखतीसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**६.५.५** लेखी परीक्षेमधून मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त होण्याकरिता शतमत **(Percentile)** पध्दत लागू आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवाराच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र असतील:-

(१) अमागास- किमान ३५ शतमत

(२) मागासवर्गीय- किमान ३० शतमत

(३) विकलांग- किमान २० शतमत

(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू- किमान २० शतमत

**६.५.६** विकलांग अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू या प्रवर्गाच्या किमान सीमा रेषेच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारास दोन्हीपैकी एकच सवलत घेता येईल.

**६.५.७** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे वैयक्तिकरित्या कळविण्यात येईल. तसेच लेखी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याची बातमी राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येईल.

**६.५.८** मुलाखतीचा कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर पात्र उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलद्वारे मुलाखतपत्र उपलब्ध करुन देण्यात येईल.

**६.५.९** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच विकलांग, महिला व पात्र खेळाडू उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**७. पदांचा पसंतीक्रम:-**

**७.१** मुख्य परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या व जाहिरात / अधिसूचनेत विहित केलेल्या अर्हता, अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांना संबंधित परीक्षेमधून भरावयाचा पदांचा पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने देणे आवश्यक राहील.

**७.२** पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी उमेदवारांस खालील अटींवर देण्यात येईल :-

(१) पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

(२) पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पदाच्या पसंतीक्रमात बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

(३) आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने पसंतीक्रम सादर न केल्यास अधिसूचनेत नमूद केलेल्या पदक्रमांकानुसारच त्यांचा पसंतीक्रम आहे, असे समजण्यात येईल व त्यात नंतर बदल करण्याची संधी देण्यात येणार नाही.

**८. मुलाखत :-**

**८.१** वरील परिच्छेद क्रमांक ६.५ नुसार उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. मुलाखत **७५** गुणांची असेल.

**८.२** आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या आणि जाहिरातीतील तरतुदीनुसार अर्हतेच्या विहित अटी पूर्ण करणा-या उमेदवारांना मुलाखतीसाठी पात्र समजण्यात येईल.

**८.३** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

**८.४** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरिता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**८.५** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व वेळेस घेण्यात येतील.

**८.६** उमेदवार विशिष्ट पदावर नेमणूक होण्यास कितपत योग्य आहे आणि त्याची मानसिक कुवत किती आहे, ते अजमावणे हा मुलाखतीचा उददे्श असतो. मुलाखतीच्या वेळी विचारण्यात येणा-या प्रश्नांमध्ये इतर प्रश्नाबरोबरच ज्यासाठी अर्ज केला आहे, त्या पदासाठी कर्तव्ये व जबाबदा-या, उमेदवाराने ज्ञानाच्या ज्या विशिष्ट क्षेत्रातील विशेषज्ञता प्राप्त केली आहे, त्या क्षेत्रातील अदययावत घडामोडी, ग्रामीण क्षेत्राच्या स्थितीबाबत त्याला असलेली माहिती आणि ग्रामीण जनतेच्या समस्या यासंबंधीचे प्रश्न याचा समावेश असतो.

**९. अंतिम निकाल :-**

लेखी परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

**१०. शिफारस :-**

**१०.१** "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

**१०.२** मुलाखत घेतलेल्या उमेदवारांना मुलाखतीनंतर शक्य तितक्या लवकर, त्यांची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही, ते प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल. तसेच, शिफारस झालेल्या उमेदवारांची नांवे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

************